# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१०/०६/२०१८
## दि.०९/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ३९७/१८,भादविक ३०७,१९५(अ),१२०(ब),३४,भारतीय हत्यार कायदा कलम ३,५,२५,२७,महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१),सह १३५ प्रमाणे |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३५ वर्षे,रा.पिंपरी,पुणे |
| **आरोपी** | तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०६/२०१८ रोजी दुपारी १२/१५ वा.एच.ए.कॉलनी येथील लक्ष्मी जनरल स्टोअर, मनमोहन जनरल स्टोअर व जुनी भाजी मंडई मधील मोकळया रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद तीन अनोळखी इसमांपैकी एका इसमा विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाची केस मागे घ्यावी या कारणावरून त्यांनी कट रचुन,फिर्यादी यांचेवर पिस्तुल मधुन फायर करुन त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), मसाजी काळे ९९२१०११३३१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २६२/१८,भादविक ३९२,५०४,३४ |
| **फिर्यादी** | चंद्रकांत गांदले,वय-५२,रा.सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०६/२०१८ रोजी १८/३० वा. शेवटचा बस स्टॉप वडगांव सिंहगड रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी भाजीपाला विक्री करीत असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना कोयत्याचा धाक दाखवुन त्यांचे मुलास जीवे मारण्याची धमकी देवुन,फिर्यादी यांचे गल्ल्यातील ४ हजार रूपये जबरदस्तीने हिसकावुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पांडुळे ९८८१३००९०६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २३३/१८,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | नफिसा शाहीर,वय-५०,रा.वानवडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०६/२०१८ रोजी ०६/४५ ते ०८/४५ वा.चे दरम्यान प्राईम अपार्टमेंट,साळुंखे विहार रोड वानवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी प्राईम अपार्टमेंट,साळुंखे विहार रोड वानवडी,पुणे येथील फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने सदर फ्लॅटचे मुख्य दरवाजाचे लॅच-लॉक कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील सोन्याचे दागिने ८,३३,०००/- रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. म्हेत्रे ९८८१२३८१५६ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे १२८/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | सौ.सुजाता धिरेन तिवारी,वय-३५,रा.ॲमनोरा पार्क टाऊन,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | रमेश रामराव वाघमारे,रा.सिध्दीविनायक कॉलनी,फुरसुंगी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०६/२०१८ रोजी ०१/३० वा. पुलगेट बस स्टॅण्ड लष्कर पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती धिरेन तिवारी हे कात्रजवरुन त्यांचे कारमधुन खाण्या मारुती चौकाकडुन पुलगेट बस स्टॉप जवळील लालको इंटीरीअर्सचे दुकानाचे समोरुन हडपसर येथे येत असताना,त्यांचे समोरुन विरध्द दिशेने येणारी पीएमपीएमएम बसवरील चालकाने त्याचे ताब्यातील बस ही चुकीच्या मार्गाने हयगयीने अविचाराने व रस्त्याचे परीस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवुन,धिरेन यांचे कारला जोरात धडक देवुन,त्यांना गंभीर जखमी करून,त्यांचे मुत्युस कारणीभुत झाला. तसेच कारचे १,००,०००/- रु किचे नुकसान केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कालगुडे ९८५०४४१७६४ |

## दि.१०/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २३४/१८,भादविक ३०७,३२३,५०४,५०६(२),१४३, १४५,१४७,१४८,१४९,३४ आर्म ॲक्ट ४,२५, महाराष्ट्र पो. का. कलम ३७(१)(३),१३५, ॲमनमेंट का. कलम ७ |
| **फिर्यादी** | किरण चव्हाण,वय-२६ वर्षे,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपी** | एकुण पाच इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०६/२०१८ रोजी २१/१० वा.श्रीगणेश मोबाईल शॉपी समोर काळेपडळ,हडपसर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र १.राहुल तडवी २.तन्वीर शेख ३.विक्की दिघे यांचेसह श्रीगणेश मोबाईल शॉपी या दुकाना समोर बोलत थांबले असताना,त्यांचे ओळखीचे यातील नमुद इसमांनी मोटार सायकलवरुन येवुन बेकायदेशीर जमाव जमवुन,सनी हिवाळे याने राहुल तडवी यास तु पोलीसांना माझी टिप का देतो व आम्ही फोर व्हिलर फोडली याची पोलीसांना टिप का दिली असे म्हणुन,सर्वांनी शिवीगाळ व मारहाण करुन आकाश बालभारती याने त्याच्या कमरेचा कोयता काढुन विक्की दिलीप दिघे,वय-२६ वर्षे,रा.संकेत विहार लाईन नं.१०,काळेपडळ,हडपसर,पुणे यास तु पोलीसांना टिप देतो,आता तुला खल्लास करतो असे म्हणुन त्याचे डोक्यात कोयत्याने वार करुन,त्यास गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच पोलीसात तक्रार दिली तर जीवे मारण्याची धमकी देवुन,सदर भागात जमाव जमवुन लोकांमध्ये दहशत निर्माण केल्याने,तेथील लोक घाबरुन पळुन जावुन, तेथील दुकानदारांनी त्यांची दुकाने बंद केली आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.ए.पवार ९०६७०६७६६४ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे २८८/१८,भादविक ३०२,३९७,३४ |
| **फिर्यादी** | दत्ता वसंत भोंडवे,वय-३०,रा.मुंपो.मावळ,जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात दोन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०६/२०१८ रोजी २१/०० ते २३/०० वा. चे दरम्यान मुंबई-बेंगलोर हायवे कोयते वस्तीला जाणारे रोडचे कडेला व जांभे नावाचे पुढे न-हे रोडचे कडेला ता.मावळ,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांची पत्नी सौ.अश्विनी दत्ता भोंडवे,वय-२५ वर्षे व मुलगा अनुज दत्ता भोंडवे,वय-०८ महिने यांचेसह त्यांचे कारमधुन डांगे चौकातुन राहते घरी जात असताना,कोणीतरी अज्ञात दोन इसमांनी मुंबई-बेंगलोर हायवे कोयते वस्तीला जाणारे रोडचे कडेला फिर्यादी यांचे कारमध्ये जबरदस्तीने घुसुन,फिर्यादी व सौ.अश्विनी यांचे तोंड रूमालाने दाबुन,फिर्यादी यांनी त्यांची कार जांभे गावाचे पुढे नेण्यास सांगुन,फिर्यादी यांचेवर वार करून त्यांची पत्नी सौ.अश्विनी हिचा गळा दोरीने आवळुन,अनुज याचे तोंड दाबुन त्यांचा खुन करून,फिर्यादी यांचे जवळील १,३०,०००/- रूपये किचे सोन्याचे दागिने,मोबाईल व रोख जबरदस्तीने घेवुन गेले. |
| **त.अंमलदार** | प्रभारी अधिकारी |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**